# शिक्षणाचे नवे रंग

डॉ. सुनिता मगरे • डॉ. केतकी सातपुते
डॉ. राजश्री जोशी

व्यावसायिक शिक्षणाची पायाभरणी / शारीरिक शिक्षणाचे नवे रूप / सर्वंकष व शाश्वत शिक्षणाकडे वाटचाल / संपूर्ण गुणवत्ता

मूल्यवर्धन शिक्षण: नवे दालन / समुदाय शिक्षण: काळाची गरज / कला समावेशित आनंददायी शिक्षण

बदलाची नांदी / शैक्षणिक धोरणाचे वैचारिक अधिष्ठान




हिमालया पब्लिशिंग हाऊस
ISO 9001:2015 CERTIFIED

## पुस्तक परिचय

भारत 21 व्या शतकातील 'ज्ञानाची महाशक्ती' बनण्याचा प्रयत्न करत आहे. यादृष्टीने शिक्षण क्षेत्राची जबाबदारी वाढली आहे. 21 व्या शतकासाठी सक्षम भारतीय तयार करण्याचे आव्हान शिक्षणक्षेत्रासमोर आहे. शालेय शिक्षणाचे चित्र बदलण्याची गरज स्पष्ट दिसत आहे. म्हणूनच या काळात प्राचीन व अर्वाचीन भारतीय शिक्षण प्रणालीचे व शिक्षण क्षेत्रात झालेल्या प्रयोगांचे  सिंहावलोकन करणे आवश्यक ठरते. 2019 चे नवीन शैक्षणिक धोरणाचा पूर्णतः अवलंब नजीकच्या काळात होईल. अशा या संधीकाळात अर्वाचीन भारतीय शिक्षणप्रणालीचा दुवा 21 व्या शतकातील शिक्षण प्रणालीशी जोडण्याचे कार्य प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून होईल असा विश्वास आहे.

शिक्षण प्रणालीत काळाप्रमाणे बदल करणे, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यशस्वी करणे आणि भारताला ज्ञानाची महाशक्ती बनविणे शिक्षकावर अवलंबून आहे. यासाठी शिक्षकाने सातत्याने व्यवसाय वृद्धी करणे जसे गरजेचे आहे तसेच सर्जनशील व प्रयोगशील राहून नवे मार्ग शोधणे आवश्यक आहे. यातील काही नव्या मार्गाची नांदी या पुस्तकातून वाचकांना मिळेल अशी आशा आहे. हे पुस्तक शिक्षण क्षेत्रात प्रवेश करणारे विद्यार्थी, शिक्षण क्षेत्रात अनेक वर्ष काम करणारे शिक्षक व शिक्षणात रस असणाऱ्या सर्वांना उपयुक्त होईल.

## लेखिका परिचय

**डॉ. सुनिता मगरे** या एम.एस्सी.(झुओलोजी), एम.एड. तसेच पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) असून मुंबई विद्यापीठात शिक्षणशास्त्र विभागात प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. मुंबई विद्यापीठात अनेक महत्वाच्या पदांवर व विभागांवर त्यांनी आपल्या कामाच्या शैलीची छाप उमटवली आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात शिकविण्याचा तसेच एमफील, पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा 25 वर्षांचा अनुभव आहे. टीईटी परीक्षा मार्गदर्शक, प्रकल्प आधारीत कृती, माहिती संप्रेषण व शैक्षणिक संपादन, शांतताशिक्षण या विषयांवर त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मासिकांमध्ये विविध विषयांवर अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. अनेक मुक्त विद्यापीठाच्या अध्यापन सामुग्रीचे लेखन त्यांनी केले आहे. भारतात झालेल्या जागतिक शैक्षणिक अधिवेशनात त्यांना प्रा. इंदिरा पारीख पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**डॉ. केतकी सातपुते** या श्री नारायण गुरु कॉलेज ऑफ एज्युकेशन, चेंबूर, मुंबई येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्या एम.कॉम., एम.ए(हिंदी), एम.एड., सेट व नेट तसेच पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) असून त्यांना शिक्षण क्षेत्रात शिकविण्याचा 12 वर्षांचा अनुभव आहे. मुंबई विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या अध्यापन सामुग्रीचे लेखन व भाषांतर त्यांनी केले आहे. शांतता शिक्षण, अनुभवधिष्टीत शिक्षण या विषयांसाठी अनेकवेळा अल्पवेळ अभ्यासक्रमाच्या समन्वयक म्हणून त्यांनी काम पहिले आहे. त्यांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मासिकांमध्ये विविध विषयांवर अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्या ओडिसी शास्त्रीय नृत्यांगना आहेत. 'महाराष्ट्र दर्शन' या प्रा. वसंत बापट यांच्या नृत्य नाटकामध्ये लोकनृत्यातही त्यांचा सहभाग होता.

**डॉ. राजश्री जोशी** या सेवासदन्स कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्या डी.एसेम, एम.ए.(मराठी साहित्य), एम.ए.(मानसशास्त्र), एम.एड., सेट तसेच पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) असून 28 वर्षांचा अनुभव आहे. त्या इग्नूच्या एम.ए.(मानसशास्त्र), यचममुविद्यापीठ व आयडोल (मुंबई विद्यापीठ) यांच्या विविध अभ्यासक्रमाच्या समन्वयक आहेत. आयडोलच्या (मुंबई विद्यापीठ) विविध अभ्यासक्रमांचे लेखन व भाषांतर त्यांनी केले आहे. त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांसाठी, पालकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा घेतल्या आहेत. त्यांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मासिकांमध्ये विविध विषयांवर अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत.

ISBN: 978-93-5596-629-2

www.himpub.com

ISBN: 978-93-5596-629-2 PCE 3286 ₹ 275/-